**वादीतर्फे साक्षीदार क्र. २ यांची शपथेवर साक्ष**

मी सत्यप्रतिज्ञेवर निवेदन करतो की,

माझे नाव - **वैभव प्रकाश बिज्ञा**

वय - ५२ वर्षे, व्यवसाय – निमतानदार क्र. २,

नेमणुक- उप अधिक्षक भुमि अभिलेख कार्यालय, कर्जत.

**सरतपास वादीतर्फे विधीज्ञ श्री. एस. व्ही. देशमुख यांच्यामार्फत :-**

१. मी दि.०१/०६/२०१७ ते सन २०१८ या कालावधीत उप अधीक्षक, भुमि अभिलेख कार्यालय, राहुरी येथे निमतानदार क्र. २ म्हणून कार्यरत होतो. दिनांक २४/०७/२०१७ रोजी आमच्या कार्यालयास मौजे आरडगाव, ता. राहुरी येथील गट क्र. १०९, १०८ व १०७ च्या मोजणीकरिता न्यायालयामार्फत आदेश प्राप्त झाले. त्यानंतर वादी यांनी दि. १९/०८/२०१७ रोजी मोजणी अर्ज कार्यालयात दाखल केला. आता मला सदर मोजणी अर्ज दाखवण्यात आला, त्यावर अर्जदार म्हणून वादी राजू वाघ यांची स्वाक्षरी आहे. सदर अर्जास **निशाणी क्र. ७५** देण्यात येते. त्यानंतर अर्जदार यांनी मोजणीची फीस भरून चलन दाखल केले. त्यानंतर दि. १९/०८/२०१७ रोजी आमच्या कार्यालयामार्फत मला मोजणीचा लेखी आदेश प्राप्त झाला. सदर लेखी आदेशास **वस्तु अ** देण्यात येते. त्यावरुन आमच्या कार्यालयामार्फत दि.०४/०९/२०१७ रोजी वादी प्रतिवादी यांना मोजणीकामी नोटीसी काढण्यात आल्या. आता मला सदर नोटीसीची स्थळप्रत दाखवण्यात आली. त्यावर आमचे कार्यालय प्रमुख यांची स्वाक्षरी असून सदर नोटीस **निशाणी क्र. ७६** वर आहे. त्यावरुन दिनांक ०५/१०/२०१७ रोजी, मी मौजे आरडगाव, ता. राहुरी येथे जायमोक्यावर मोजणी करीता गेलो. मोजणीच्या वेळी वादी व प्रतिवादी हजर होते. त्यानंतर वादी प्रतिवादी यांनी त्यांची चालू वहिवाट दाखवली.

२. मी इटीएस मशीनच्या सहायाने वादग्रस्त मिळकतीचे मोजणी काम केले व उपलब्ध अभिलेखाचे आधारे अर्जदार व लगतचे धारक यांचे समक्ष हद्दीखुना दाखविल्या. त्यानंतर मी वादी व प्रतिवादी यांचे जबाब नोंदविले. आता मला वादी प्रतिवादी यांचे जबाबाची प्रत दाखविण्यात आला त्यावर वादी व प्रतिवादी व माझी समक्ष म्हणून स्वाक्षरी आहे. सदर जबाब **निशाणी क्र. ७७** वर आहे. त्यानंतर मी पंचांच्या समक्ष पंचनामा केला. आता मला सदर पंचनाम्याची सत्यप्रत दाखविण्यात आली, त्यावर माझी व पंचांच्या स्वाक्षरी आहेत, त्यास **निशाणी क्र. ७८** देण्यात येते. त्यावरुन मी मोजणी प्रमाणे नकाशा तयार केला. आता मला सदर नकाशाची 'ब' प्रत दाखविण्यात आली. त्यावर माझी स्वाक्षरी आहे. त्यातील मजकूर खरा व बरोबर आहे. सदर 'ब' प्रत ही **निशाणी क्र. ७९** वर आहे. सदर मोजणीअंती, वादी यांच्या गट क्र. १०९/१ब मध्ये त्यांचे ७/१२ नुसार १ हेक्टर ३३ आर एवढे क्षेत्र असून प्रत्यक्षात त्यांच्या वहिवाटीस १ हेक्टर २० आर एवढे क्षेत्र आढळून आले. वादीचे कमी असलेले क्षेत्र हे गट क्र. १०९/१अ किसन केसू वाघ यांच्याकडे १० आर एवढे अधीकचे आढळून आले. सदर क्षेत्र नकाशामध्ये निळया रंगाने दर्शवलेले आहे.

सरतपास पुर्ण.

**उलटतपास प्रतिवादी क्र. ६अ ते ६ड तर्फे विधीज्ञ श्री. ढोकणे यांच्यामार्फत-**

३. मोजणीसाठी प्रतिवादी क्र. ६ किसन वाघ यांना आमच्या कार्यालयाने नोटीस काढली नव्हती. किसन वाघ त्यावेळेस दाव्यात पक्षकार नव्हता म्हणून त्यावेळेस नोटीस काढली नव्हती. नि.क्र. ७९ वर वादीचा वादग्रस्त मिळकतीचा हिस्सा गट नंबर नमूद नाही. मी मोजणीकामी मुळ टिपण, स्कीमचा उतारा व नकाशा घेवून गेलो होतो. तसेच मुळ सर्व्हे नंबरचे रेकॉर्ड घेवून गेलो होतो. मोजणीपुर्वी मी मुळ सर्व्हे नंबरच्या संपुर्ण वहिवाटी पाहिल्या होत्या. मोजणीकामी माझ्या कार्यालयातील एक इसम हजर होते. मला

त्यांचे नाव आजरोजी सांगता येणार नाही. गट क्र. १०९ चा पुर्वीचा ६५ असा होता. मोजणीच्या वेळी मला जुना ओएफ दगड मिळाला नाही. हे म्हणणे खरे नाही की, त्याकारणे मोजणीमध्ये फरक होवू शकतो. मी मोजणी नकाशामध्ये ओएफ पॉइट नमूद केला नाही. वादीने गट क्र. १०९ ची मोजणी करून मागितली होती. नकाशामध्ये मी लाल रंगाने सदर धारकांचे क्षेत्र दर्शवलेले आहे. सर्व्हे मॅन्युअल नुसार मोजणी नकाशामध्ये रस्ते, विहीर, घर, चारी व विद्युत पोल दाखवावे लागतात. मी नि.क्र. ७९ वरील मोजणीमध्ये विहीर दर्शवलेली आहे. मी वादी व प्रतिवादी क्र. ६ यांचे गट क्र. १०९ मध्ये विहिरीच्या पश्चिमेला यांची सामाईक वस्ती दाखवली नसल्याबद्दल मला सांगता येणार नाही. मी गट क्र. १०९ मध्ये अंतर्गत रस्ता दाखवलेला आहे. हे म्हणणे खरे नाही की, वादीच्या गट क्र. १०९ च्या पुर्व बांधाने दक्षिणोत्तर रस्ता आहे. वादी व प्रतिवादी क्र. ६ यांच्या सामाईक बांधातून चारी गेलेली असून ती मी नकाशामध्ये दाखवली आहे. सदर चारीच्या उत्तरेला रस्ता असल्याचे मला सांगता येणार नाही. हे म्हणणे खरे नाही की, मी वादीच्या सांगण्याप्रमाणे चुकिचा नकाशा तयार केला. हे म्हणणे खरे नाही की, आजरोजी मी वादीच्या सांगण्यावरून खोटी साक्ष देत आहे.

उलटतपास पुर्ण.

फेरतपास काही नाही.

श्रवणोत्तर स्विकृत

MAYUR EKNATHRAO PAWAR
Digitally signed by MAYUR EKNATHRAO PAWAR
Date: 2026.01.30 17:07:29 +0530

(मयुर ए. पवार)
दिवाणी न्यायाधीश वरिष्ठ स्तर,
ता. राहुरी, जि. अहमदनगर.

दिनांक:-३०/०१/२०२६.